*"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -२०१५"*

**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग,

*जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या:* http://wrd.maharashtra.gov.in/

क्र. संकीर्ण 2015/268/15/लपा-१

हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई.३२.
दिनांक:- 16/09/2015

प्रति,

सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

| | |
|---|---|
| **विषय:-** | **जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर विभागातील सर्व कार्यालयांची माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती अपलोड करणेबाबत** |

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये सर्व शासकीय कार्यालयांना त्यांचेसंबंधित असलेली १ ते १७ या विहित बाबींची माहिती प्रसिध्द करणे अनिवार्य आहे. तसेच सदर माहिती वेळोवेळी अद्यावत करणे आवश्यक आहे.

सदर माहिती जलसंपदा विभागाचे एकात्मिक संकेतस्थळ www.wrd.maharashtra.gov.in यावर उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक सुविधा प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१) **जलसंपदा विभागातील प्रत्येक कार्यालयाने (महामंडळ पासुन ते सिंचन शाखेपर्यंतचे सर्व कार्यालये) त्यांच्या कार्यालयाच्या संबंधातील "माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती" यासाठी विकसित केलेल्या प्रणालीमध्ये संकेतस्थळावर अपलोड करणे अनिवार्य करण्यात येत आहे, याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख यांची असणार आहे.**

२) **सदर माहिती तयार करण्यासाठीचे प्रपत्र (Word Format मध्ये) जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावरील "माहिती अधिकार" अंतर्गत "डाऊनलोड" या टॅब अंतर्गत उपलब्ध असलेल्या "माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती प्रपत्र" या लिंकवर उपलब्ध आहे. सर्व कार्यालयांनी त्यांची माहिती याच प्रपत्रामध्ये उपलब्ध करुन द्यावी.**

३) **अशा प्रकारे तयार केलेल्या माहितीमध्ये भविष्यात कोणताही बदल झाल्यास, किंवा माहिती अधिकार कायद्यामध्ये नमुद केलेल्या कालावधीनुसार तपासणी दरम्यान कोणताही बदल निदर्शनास आला असल्यास, असा बदल प्रपत्रामध्ये करुन सदर PDF फाईल नव्याने प्रणालीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये माहिती अद्यावत राहील याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख यांची असेल.**

४) सदर माहिती पहिल्यांदा अथवा वेळोवेळी अपलोड करताना संबंधित कार्यालय प्रमुख यांनी प्रमाणित करणे आवश्यक असुन, त्याचे प्रपत्र उपरोक्त अ.क्र. २ मध्ये नमुद केलेल्या लिंकवर उपलब्ध आहे.

५) सदर माहिती अपलोड करताना ती PDF मध्येच असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे तयार केलेली माहिती अपलोड करण्यासाठी प्रथमत: ई-सेवा पुस्तक प्रणालीच्या https://services.mahaonline.gov.in/HRMS-WRD/Masters/Login.aspx या लिंकवर जाऊन प्रणालीमध्ये सोबत जोडलेल्या माहितीपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन माहिती अपलोड करणे आवश्यक राहील.

६) जलसंपदा विभागातील सर्व कार्यालयांची अशा प्रकारे अपलोड केलेली माहिती विभागाचे संकेतस्थळ www.wrd.maharashtra.gov.in वरील "माहिती अधिकार" या टॅब अंतर्गत "स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करावयाची माहिती" या टॅब अंतर्गत उपलब्ध असेल. त्यामध्ये माहिती अचुक अपलोड झाली आहे, याची खात्री देखील संबंधितांनी करावी. या बाबतीत कोणतीही तांत्रिक अडचण असल्यास, Mahaonline Help Line क्र. 022-61316400 वर अथवा support@mahaonline.gov.in या ई-मेलवर संपर्क साधुन अडचणीचे निराकरण करुन घ्यावे.

७) सदर माहिती अपलोड करण्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतचे सविस्तर माहितीपत्रक सोबतच्या "प्रपत्र अ" जोडण्यात आलेले आले. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

८) सर्व कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयाची सदर माहिती दि. १५ आक्टोंबर २०१५ पुर्वी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

९) जलसंपदा विभागातील सर्व प्रादेशिक कार्यालयांनी त्यांची तसेच त्यांचे अंतर्गत असलेले सर्व कार्यालये (मंडळ ते सिंचन शाखा) यांची उपरोक्त माहिती संकेतस्थळावर अपलोड झाल्याची खात्री करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र सहायक मुख्य अभियंता यांचे स्वाक्षरीने दि. १६ ऑक्टोंबर २०१५ पर्यंत श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांना pravinkolhe82@gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात यावे. प्रादेशिक कार्यालयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कार्यालयाने अशा प्रकारचे प्रमाणपत्र सादर करु नये. सदर प्रमाणपत्राचा मसुदा "प्रपत्र-ब" मध्ये देण्यात आला आहे. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी प्राप्त प्रमाणपत्रांची यादी व ज्या कार्यालयांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केली नाही त्यांची यादी शासनास सादर करावी.

१०) याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कोणतीही अडचण असल्यास प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मधील श्री. नंदकिशोर रणवरे, सहा. अभि. श्रेणी-१ यांच्याशी ई-मेल ae1trg.pmo@gmail.com , दुरध्वनी क्रमांक ०२०-२५४६८९८२ (Ext-८०८) वर संर्पक साधुन अडचणीचे निराकरण करावे.

सहपत्रः-

१) प्रपत्र अ - RTI माहिती अपलोड करण्याबाबतच्या कार्यवाहीबाबतचे सविस्तर युजर मॅन्युअल
२) प्रपत्र ब - सहायक मुख्य अभियंता यांनी सादर करावयाचे प्रमाणपत्र

**डॉ. संजय बेलसरे**
**शासनाचे उपसचिव**

प्रतिलिपीः

१) संबंधित कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय : जलसंपदा विभागाच्या अनुषंगाने मंत्रालयातील माहिती उपरोक्त सुचनांच्या अनुषंगाने अपलोड करणे व वेळोवेळी अद्यावत करुन अपलोड करणे ही कार्यवाही पार पाडण्यात यावी.

# प्रपत्र - अ

# जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर विभागातील सर्व कार्यालयांची माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती अपलोड करणेबाबत माहितीपत्रक

१) RTI Disclosure बाबतची माहिती ई-सेवा पुस्तक प्रणालीमधील “Office Details” या टॅब अंतर्गत अपलोड करावी लागेल. सदर कार्यवाही प्रत्येक कार्यालयाच्या DDO यांनी करावयाची असुन त्यांनी या प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या सर्व कार्यालयांचे RTI Disclosure प्राप्त करावे व DDO यांनी त्यांचा DDO चा युजर आयडी व पासवर्ड वापरुन त्याच्या अंतर्गत registered झालेल्या सर्व कार्यालयांचे RTI Disclosure अपलोड करु शकतो. त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

२) ई सेवा पुस्तक प्रणालीच्या https://services.mahaonline.gov.in/HRMS-WRD/Masters/Login.aspx या लिंकवर क्लिक करुन लॉग इन मध्ये DDO यांनी आपला स्वत:चा युजर आयडी व पासवर्ड भरावा. (DDO Code व त्याचा पासवर्ड)




३) लॉग इन झाल्यानंतर “Config” या टॅब अंतर्गत “Office Details” या टॅब वरती क्लिक करावे.




४) DDO यांनी ज्या कार्यालयाचे RTI Disclosure PDF अपलोड करायचे आहे, त्याच्या “Office Details” मधिल Update या बटन वरती क्लिक करावे,




५) आता “Proactive Disclosures Under RTI Act 2005” या फिल्ड मध्ये जाऊन आपण सदर कार्यालयाची PDF फाईल अपलोड करावी व अपडेट या टॅबवर क्लिक करुन माहिती सेव्ह करावी.




६) माहिती अपलोड झाल्याची खातरजमा करण्यासाठी आपण ई सेवापुस्तकाच्या मुख्य पानावरील “Proactive Disclosures Under RTI Act 2005” किंवा जलसंपदा विभागाच्या मुख्य संकेतस्थळावरील “माहिती अधिकार >> स्वयंप्रेरणे प्रसिदृध करावयाची माहिती” या टॅब वरती जाऊन सदर रिपोर्ट मध्ये कार्यालयाचा फिल्टर लावुन माहिती बरोबर अपलोड झाल्याबाबत खात्री करुन घ्यावी.




A- A A+
संगणक प्रशासक | प्रश्न | साईटमॅप | मुख्य विषयाकडे जा | English
जलसंपदा विभाग,
महाराष्ट्र शासन, भारत
Water Resources Department,
Government of Maharashtra, India
मुख्यपृष्ठ आमच्याविषयी महामंडळे व संस्था ई-जलसेवा प्रकल्प बांधकाम जलसंपदा व्यवस्थापन कार्यक्रम निविदा जल आराखडा ज्ञान केंद्र माहिती अधिकार
****** झिम्ब्रा मेल पासवर्ड रिसेट करणेबाबत*
माहिती अधिकार अधिनियम
डाऊनलोड
माहिती अधिकार नियम
स्वयंप्रेरणे प्रसिद्ध करावयाची माहिती
परिपत्रके
वारंवार विचारले जाणारे प्रश्न


जलसंपदा विभाग,
महाराष्ट्र शासन, भारत
Water Resources Department,
Government of Maharashtra, India
Proactive Disclosures Under RTI Act 2005 for All WRD Offices
संकेतस्थळाचे मुख्यपृष्ठ
Back to WRD Site
Office
Chief Engineer & Chief Administrator, Command Area Development,
Place
--Select--
Search
Reset
Chief Engineer & Chief Administrator, Command Area Development, Water Resource Department - Aurangabad
Superintending Engineer, Jayakwadi Project Circle - Aurangabad
Click Here to View RTI Disclosures
Executive Engineer,Majalgaon Canal Division No. 10 - Parbhani
Executive Engineer,Majalgaon Canal Division No. 7 - Gangakhed
Executive Engineer,Majalgaon Project Division - Kesapuri
Superintending Engineer, Upper Penganga Project Circle - Nanded
Executive Engineer,Upper Penganga Project Division No.5 - Hadgaon
Executive Engineer,Upper Penganga Project Division No.6 - Chitnaynagar
Executive Engineer,Upper Penganga Project Division No. 4 - Akhada Balapur
Executive Engineer,Upper Penganga Project Division No. 8 - Chitnaynagar

# प्रपत्र-ब

## प्रादेशिक कार्यालय व त्यांचे अधिनस्त असलेले सर्व कार्यालय (मंडळ ते सिंचन शाखा) यांची “माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती” जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावर अपलोड केल्याबाबतचे प्रमाणपत्र

**प्रादेशिक कार्यालयाचे नावः** ______________________________________________

प्रमाणित करण्यात येते की, या प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यालयांची संख्या असुन, त्यांनी त्यांचे कार्यालयाचे संबंधित “माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती” जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावर विहित प्रपत्रामध्ये अपलोड करण्यात आली आहे. सदर माहिती जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावर उपलब्ध असुन, ती PDF मध्ये Download करता येत आहे.

| **अ.क्र.** | **कार्यालांचा प्रकार** | **प्रादेशिक कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या कार्यालयांची संख्या** | **माहितीचा अधिकार अधिनियम-२००५, कलम ४(१)(ख) अन्वये प्रसिध्द करावयाची १ ते १७ बाबींची माहिती” संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कार्यालयांची संख्या** |
|---|---|---|---|
| १) | प्रादेशिक कार्यालय | १ | |
| २) | मंडळ कार्यालये | | |
| ३) | विभागिय कार्यालये | | |
| ४) | उप-विभागिय कार्यालये | | |
| ५) | सिंचन शाखा | | |
| ६) | इतर (लागु असल्यास) | | |
| | **एकुण** | | |

दिनांकः

(स्वा)

सहायक मुख्य अभियंता

(नावः )